राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र,पुणे.

राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन – २०२२/२३

गट क्रमांक – ५
(अध्यापकाचार्य व पर्यवेक्षीय अधिकारी गट)

नवोपक्रम शीर्षक

# करून विज्ञानाचा जागर शिक्षक झाले इन्स्पायर

नवोपक्रम कर्ता
श्री.रमेश बापू कोरे
अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था ,कोल्हापूर
तथा
प्र.विज्ञान सल्लागार,
शिक्षण उपसंचालक कार्यालय,कोल्हापूर

सन – २०२२/२३

# ऋणनिर्देश

प्रस्तुत नवोपक्रम सादरीकरण करताना अनेक हातांनी मदत केली. त्यांच्याविषयी ऋण व्यक्त करणे हे नवोपक्रम कर्ता आपले आद्य कर्तव्य मानतो. या सर्वांच्या सहकार्यामुळेच नवोपक्रम कर्त्याला प्रस्तुत नवोपक्रम सादर करणे शक्य झाले.

**'करून विज्ञानाचा जागर शिक्षक झाले इन्स्पायर'** हा नवोपक्रम मा. महेश चोथे, शिक्षण उपसंचालक,कोल्हापूर व मा. डॉ. आय.सी. शेख, प्राचार्य,जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनाखाली आयोजित करणेत आला. सदर अधिकाऱ्यांनी नियोजन व अंमलबजावणीमध्ये दिलेले स्वातंत्र्य व प्रेरणेमुळे चांगल्या पद्धतीने कार्यशाळा घेता आल्या.

सदर नवोपक्रम घेताना राज्यस्तरावरून नियोजन व प्रत्यक्ष अंमलबजावणी संदर्भात मा.रत्ना गुजर ,संचालक राज्य विज्ञान शिक्षण संस्था,नागपूर , मा.श्री.राजू नेब, विज्ञान पर्यवेक्षक राज्य विज्ञान शिक्षण संस्था,नागपूर यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

सदर नवोपक्रमासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील सर्व सन्माननीय वरिष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता, विषय सहाय्यक, जिल्हा समावेशित शिक्षण समन्वयक, जिल्हा समुपदेशक व कार्यालयातील सर्व कर्मचारी यांची मोलाची मदत झाली.श्री.विजय भिसे, वरिष्ठ अधिव्याख्याता यांनी सदर कार्यशाळेसाठी पूर्वतयारीमध्ये मोलाचे सहकार्य केले.

जिल्हानिहाय कार्यशाळा घेत असताना संबंधित जिल्ह्याचे सर्व सन्माननीय शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्री. एकनाथ आंबोकर -कोल्हापूर,श्रीम. सुवर्णा सावंत -रत्नागिरी,श्री.सुभाष चौगुले -सांगली,श्री. मुष्ताक शेख - सिंधुदुर्ग, श्रीम.प्रभावती कोळेकर - सातारा तसेच संबंधित जिल्ह्याचे सन्माननीय उपशिक्षणाधिकारी/विज्ञान निरीक्षक श्री. दिगंबर मोरे - कोल्हापूर, श्री. नरेंद्र गावंड, श्री.गोपाल चौधरी- रत्नागिरी ,श्री पोपट मलगुंडे - सांगली, श्रीमती.संगीता मोरे - सातारा, श्रीम.मांजरेकर - सिंधुदुर्ग, व त्यांचे सोबत इन्स्पायर ॲवॉर्ड संदर्भात तांत्रिक कामकाज पाहणारे सर्व सहकारी शिक्षक यांची सुद्धा कार्यशाळेचे नियोजन व आयोजना संदर्भात मोलाची मदत झाली.

कार्यशाळेचे प्रारूप तयार करताना कोल्हापूर जिल्ह्यातील इन्स्पायर ॲवॉर्डमध्ये उत्तम काम करणारे माझे सर्व तज्ञ सहकारी शिक्षक यांच्या सहकार्या अभावी ही कार्यशाळा परिपूर्ण झाली नसती.सर्वच तज्ञ मार्गदर्शकांचे कार्यशाळेसाठी बहुमोल असे सहकार्य मिळाले. कार्यशाळेच्या आयोजना संदर्भात तांत्रिक बाबींसाठी सहकार्य करणारे शिक्षण उपसंचालक कार्यालयातील श्री. किरण भुसारे व श्री. शंकर वरंडकर यांचे वेळोवेळी सहकार्य मिळाले. विभागातील पाचही जिल्ह्यातील सर्व मुख्याध्यापक व विज्ञान प्रेमी शिक्षक यांनी सदर कार्यशाळेमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेऊन इन्स्पायर अवॉर्ड मध्ये चांगली कामगिरी बजावली. या सर्वांच्या सहकार्यामुळे कार्यशाळा अतिशय चांगल्या पद्धतीने पार पडल्या.सदर नवोपक्रम पूर्ततेसाठी सहाय्यभूत ठरलेल्या सर्व ज्ञात - अज्ञात मदतीच्या हातांचे मनस्वी आभार !!!

**दिनांक** : ३०/११/२०२२

**स्थळ** : कोल्हापूर

**(रमेश बापू कोरे)**
अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण ,कोल्हापूर
तथा
प्र.विज्ञान सल्लागार,
शिक्षण उपसंचालक कार्यालय,कोल्हापूर

॥

# प्रतिज्ञापत्र

मी **श्री. रमेश बापू कोरे** प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला "**करून विज्ञानाचा जागर शिक्षक झाले इन्स्पायर**" हा उपक्रम माझ्या स्वतःच्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वतःला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा उपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीयन नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे अजून आल्यास तो कॉपीराईट ॲक्ट १९५७ खाली दाखल पात्र गुन्हा आहे. याची मला कल्पना आहे.

**दिनांक** : ३०/११/२०२२

**स्थळ** : कोल्हापूर

**(रमेश बापू कोरे)**
अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण ,कोल्हापूर
तथा
प्र.विज्ञान सल्लागार,
शिक्षण उपसंचालक कार्यालय,कोल्हापूर

कार्यालयाचा शिक्का :

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट)
सत्यमेव जयते
कोल्हापूर

III

# प्रमाणपत्र

प्रामाणित करण्यात येते की, **श्री. रमेश बापू कोरे** हे माझ्या कार्यालयात अधिव्याख्याता/प्र.विज्ञान सल्लागार या पदावर अतिरिक्त प्रभाराने कार्यरत असून त्यांनी सादर केलेला "**करून विज्ञानाचा जागर शिक्षक झाले इन्स्पायर**" हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष २०२२/२३ मध्ये त्यांनी स्वतः राबविलेला असून ती त्यांच्या स्वपरिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

**दिनांक** : ३०/११/२०२२

**स्थळ** : कोल्हापूर

**(श्री.महेश चोथे)**
**शिक्षण उपसंचालक,**
**कोल्हापूर विभाग कोल्हापूर.**

**शिक्का :**

IV

# प्रमाणपत्र

प्रामाणित करण्यात येते की, **श्री. रमेश बापू कोरे** हे माझ्या कार्यालयात अधिव्याख्याता/प्र.विज्ञान सल्लागार या पदावर कार्यरत असून त्यांनी सादर केलेला **"करून विज्ञानाचा जागर शिक्षक झाले इन्स्पायर"** हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष २०२२/२३ मध्ये त्यांनी स्वतः राबविलेला असून ती त्यांच्या स्वपरिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

**दिनांक** : ३०/११/२०२२

**स्थळ** : कोल्हापूर

**(डॉ.आय.सी.शेख)**
**प्राचार्य,**
**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,**
**कोल्हापूर.**

**शिक्का :**

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट)
सत्यमेव जयते
कोल्हापूर

V

# अनुक्रमणिका


| अ.नं. | तपशील | पान.नं. |
|---|---|---|
| १ | नवोपक्रमाचे शीर्षक | I |
| २ | ऋणनिर्देश | II |
| ३ | प्रतिज्ञापत्र | III |
| ४ | प्रमाणपत्र | IV- V |
| ५ | अनुक्रमणिका | VI |
| ६ | प्रास्ताविक | ८ |
| ७ | नवोपक्रमाची गरज व महत्व | १०-११ |
| ८ | नवोपक्रमाची उद्दिष्टे | १२ |
| ९ | नवोपक्रमाचे नियोजन | १२-२२ |
| १० | नवोपक्रमाची कार्यपद्धती | २३-२८ |
| ११ | नवोपक्रमाची यशस्विता | २८-३० |
| १२ | समारोप | ३०-३१ |
| १३ | संदर्भ सूची व परिशिष्टे | ३२-४० |

## १. प्रास्तावना :

"आगामी दशक हे 'इनोव्हेशनचे दशक' असेल." असं म्हणत आपल्या राष्ट्रपतींनी ०४ जून २००९ च्या संसदेमधील आपल्या अभिभाषणाची समाप्ती केली होती. ०७ जूनला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी कैरो येथे संबोधताना "शिक्षण आणि नवनिर्माण(इनोव्हेशन) ही एकविसाव्या जगाची चलनी नाणी आहेत असं संबोधित केलं." सखोलपणे शोधायला गेलं तर 'इनोव्हेशन' हे आज चलनी नाणं बनलं आहे. युरोपियन युनियनने २००९ हे वर्ष 'सर्जनशीलता आणि नवनिर्माणाचं वर्ष' म्हणून जाहीर केलं आहे. जगातला कोणताही प्रयोगशील देश असो त्यांच्या विज्ञान तंत्रज्ञान खात्याच्या नावांमध्ये नवनिर्माण हा शब्द आवर्जून घालण्यात येत आहे. अर्जेंटिनाच्या खात्याचे नाव आहे 'विज्ञान तंत्रज्ञान आणि उत्पादनक्षम नवनिर्मिती'

नवनिर्माण हे एकाएकी चलनी नाणं कसं झालं? नवनिर्माण आधारित विकास, नवनिर्माणवर आधारित उद्यमशीलता, नवनिर्माणवर आधारित स्पर्धा या काही पोकळ घोषणा नाहीत तर ही आजची सत्य परिस्थिती आहे. सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन करण्याची ताकद नवनिर्माणमध्ये आहे हे आता सगळ्यांना कळून चुकलयं. नवनिर्माण म्हणजे दुसरं तिसरं काहीही नसून सृजनशील नाविन्यपूर्ण कल्पनांना नवीन उत्पादन, अधिक सुधारित उत्पादन आणि प्रक्रिया सेवा यांच्यामध्ये परावर्तित करणे होय.

भारतीय तरुण मुलं-मुली पुन्हा मूलभूत विज्ञान संशोधनाकडे वळावे म्हणून भारत सरकार सुद्धा कसोशीने प्रयत्नशील आहे. इन्स्पायर ही नवी योजना त्यासाठीच सुरू करण्यात आली आहे. याद्वारे नवनवीन कल्पना, विज्ञानात नूतनाविष्कार करणाऱ्या बुद्धिमान मुलांना संशोधनासाठी मोठ्या प्रमाणात प्रेरणा आणि प्रोत्साहन देण्यात येत आहे.

### १.१. इन्स्पायर अॅवॉर्ड योजना स्वरूप व पार्श्वभूमी :

थोर शास्त्रज्ञ,संशोधक व जनतेचे राष्ट्रपती भारतरत्न डॉ.अब्दुल कलाम यांनी ही गरज ओळखून त्यांच्या प्रेरणा व संकल्पेनेतून २००९ पासून विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग, भारत सरकार द्वारे इन्स्पायर अॅवॉर्ड योजनेची सुरुवात केली. याचे आयोजन

विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग भारत सरकार आणि राष्ट्रीय नवप्रवर्तन प्रतिष्ठान, भारत यांच्या सहकार्याने केले जात आहे.सृजनशील, कल्पनाशील मुले ही राष्ट्राची संपत्ती आहे. संवेदना, सृजनशीलता व सहकार्य ही भावना मुलांना योग्य नागरिक बनवतात; परंतु सर्वच मुलांची क्षमता वेगवेगळी असते. मुलांना सर्वोत्तम बनविण्यासाठी आम्हाला जोर द्यावा लागेल. भविष्यात त्यांचा हाच गुण समाजासाठी उपयुक्त ठरेल. नवाचाराच्या ऊर्जेने देशासाठी रचनात्मक व समावेशक कार्य करू शकतील. त्यासाठी इन्स्पायर अ‍ॅवॉर्ड मानक भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाद्वारे संचालित एक विशिष्ट कार्यक्रम आहे. याचा मुख्य उद्देश वर्ग सहावी ते दहावीमधील प्रतिभाशाली विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करून करून त्यांना विज्ञानाकडे आकर्षित करणे आहे.इन्स्पायर अ‍ॅवॉर्ड मानकाच्या अंतर्गत विद्यार्थ्यांचे सर्वोत्तम विचार समाजाच्या दैनंदिन समस्यांचे समाधान करतात. या व्यतिरिक्त घरगुती आणि श्रमिकांचे श्रम कमी करण्याचे उपाय ज्यामुळे त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासोबतच सेवासुद्धा सहज मिळतील. मुख्याध्यापकांद्वारे शाळेमध्ये आयडिया स्पर्धेअंतर्गत विद्यार्थ्यांचे सर्वोत्तम विचार निवडले जातात. ज्यांचे नामांकन विज्ञान व तंत्रज्ञान विभाग भारत सरकारच्या वेबपोर्टल (ई-मॅनेजमेंट ऑफ इन्स्पायर अ‍ॅवार्ड स्कीम) वर केले जाते. विज्ञान व तंत्रज्ञान विभागाद्वारे राष्ट्रीय नवप्रवर्तन प्रतिष्ठान व भारत सरकारतर्फे १ लाख विचारांना निवडले जाते. सर्व विद्यार्थ्यांना १० हजार रुपयांचे पुरस्कार देण्यात येतात. राज्यस्तरीय प्रदर्शनातून सर्वोत्कृष्ट प्रकल्पांची राष्ट्रीय प्रदर्शनासाठी निवड करण्यात येते. यातून ६० सर्वोत्तम प्रतिकृती राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवडले जाते.यासाठी शाळेत आयडीया स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांच्या विचारांना प्रोत्साहन दिले जाते.

इन्स्पायर अ‍ॅवॉर्ड मानक योजना राष्ट्रीय आकांक्षा आणि ज्ञानास चालना देणारे,भावी नवप्रवर्तकांकरीता प्रेरक आहे. शालेय मुलांमध्ये सर्जनशील आणि रचनात्मक विचारांची संस्कृती विकसित करण्यासोबतच विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सामाजिक गरजांना पूर्ण करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

नवोपक्रम कर्त्याकडे २३ सप्टेंबर २०२१ रोजी विज्ञान सल्लागार या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला. नवोपक्रम कर्त्याने सुरवातीला योजनेविषयी माहिती जाणून घेऊन विभागातील जिल्ह्यांची सांख्यिकीय माहिती जाणून घेतली.

विभागातील पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, मुख्याध्यापक व शिक्षक यांच्याशी सदर योजनेविषयी संवाद साधला. या सर्वातून असे लक्षात आले की, सदर योजनेमध्ये सहभाग वाढविण्यासाठी जाणीव जागृतीच्या गरजेतून "**करून विज्ञानाचा जागर शिक्षक झाले इन्स्पायर"** हा नवोपक्रम हाती घेणेत आला.

## २.नवोपक्रमाची गरज व महत्व :

### २.१ नवोपक्रमाची गरज :

रिचर्ड फिनमन यांचं हे वक्तव्य प्रसिद्ध आहे. "नवीन कल्पना न सूचना ही विज्ञानाची समस्या नसून जुन्या कल्पना निसटून जाणं ही विज्ञानाची समस्या आहे. विज्ञानामध्ये सर्जनशीलता हवी असेल, नित्यनूतन भर पडायला हवी असेल तर प्रचलित संकल्पनांच्या बद्दल काही प्रमाणात बंडखोरी असणं अत्यंत गरजेचं आहे तरच जिज्ञासा जागृत राहील."

आज आपल्याला भारतीय विज्ञानामध्ये या बंडखोर वृत्तीची खरी गरज आहे. 'बाबा वाक्यं प्रमाणम्' , शिक्षक केंद्रित अध्यापन पद्धती याच्या पलीकडे जाऊन आपण विद्यार्थी केंद्रित शिक्षण पद्धतीचा विचार केला पाहिजे. आपल्या मनोवृत्ती बदलून नवीन संशोधनात्मक कृती रुजविणे, धोके पत्करणे आणि अपयश यांच्याकडे बघण्याची सहिष्णुवृत्ती जोपासणे. सर्जनशीलतेला प्रतिष्ठा देऊन नवनवीन कल्पनांचे धुमारे फुटणाऱ्या सर्जनशील तरुणाईला भक्कम आर्थिक पाठबळ देणे ही काळाची गरज आहे. २००१ मध्ये आदरणीय पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी म्हणाले होते "जर भारतीय विज्ञान खऱ्या अर्थाने समृद्ध करायचे असेल तर नोकरशाही, सरकारी अधिकारी यांची भूमिका संशोधकांचे मालक असे नसून विज्ञानाच्या वाढीसाठी काम करणारे सेवक अशी असायला हवी."

नवोपक्रम कर्त्यास विज्ञान सल्लागार या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळताना पर्यवेक्षीय यंत्रणा, मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व त्या अनुषंगाने शासनातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या उपक्रमांविषयी जाणीव जागृती निर्माण करण्याची गरज भासू लागली. खालील मुद्द्यांच्या आधारे ही गरज अधिक अधोरेखित होते.

१.कोरोनाच्या पार्श्वभूमीवरती एक प्रकारची शिथिलता आली होती.

२.पर्यवेक्षीय यंत्रणा,मुख्याध्यापक व विद्यार्थी यांच्याशी संवाद साधताना विज्ञान विषयक योजनांविषयी जाणीव जागृती निर्माण करण्याची गरज वाटु लागली.

३.शैक्षणिक वर्ष २०२१/२२ मध्ये इन्स्पायर अवॉर्ड योजनेमध्ये विभागातील सहभागाची संख्या घटू लागल्याचे सांख्यिकी माहीतीतून निदर्शनास आले .

४.इन्स्पायर ॲवॉर्ड मानक योजनेविषयी मुख्याध्यापक, शिक्षक यांच्यामध्ये इन्स्पायर ॲवॉर्ड मानक योजना,त्याचे स्वरूप, कल्पनांची निवड, सादरीकरण व विद्यार्थ्यांना मिळणारे फायदे याविषयी अधिक मार्गदर्शनाची अपेक्षा व्यक्त केली गेली.

५.राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय यश मिळवण्यासाठी शिक्षक अधिक माहिती जाणून घेण्यासाठी उत्सुक होते.

६.सर्वोत्तम कल्पना विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या वेब पोर्टलवर कशा अपलोड कराव्यात, त्याच्या तांत्रिक मदतीची व माहितीची शिक्षकांना गरज होती.

७. इन्स्पायर ॲवॉर्ड मानक योजनेची माहिती शहरी व ग्रामीण भागातील सर्व शाळा पर्यंत पोहोचण्याची गरज होती.

एकूणच मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांच्याकडून इन्स्पायर अवॉर्ड मानक योजनेची सखोल अशा कार्यशाळेची गरज स्पष्ट केली गेली.

## २.२ नवोपक्रमाचे महत्त्व :

१.सदर नवोपक्रमातून शिक्षक- विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशील विचार व संशोधन वृत्तीस चालना निर्माण होण्यास मदत होईल.

२.विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्तीला चालना मिळण्यासाठी शासनाच्या विविध उपक्रम,योजना व माहिती सर्वांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल.

३.प्रशासकीय यंत्रणा शिक्षकांच्या मदत व सहकार्यासाठी आहे याची जाणीव निर्माण होईल.

### ३.नवोपक्रमाची उद्दिष्टे :

१.जिल्हास्तरीय अधिकारी,मुख्याध्यापक,शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये इन्स्पायर ॲवॉड्र्स मानक कार्यक्रमाबद्दल अडचणी जाणून घेऊन एकदिवसीय कार्यशाळेचे प्रारूप तयार करणे.

२.जिल्हास्तरीय अधिकारी,मुख्याध्यापक,शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये इन्स्पायर ॲवॉड्र्स मानक कार्यक्रमाबद्दल जागरूकता आणि कार्यक्षमता वाढविण्याकरिता क्षेत्रीय कार्यशाळेंचे आयोजन करणे.

३. मुख्याध्यापकाद्वारे शाळेमध्ये आयडिया स्पर्धेचे आयोजन करून सर्वोत्तम कल्पना निवडण्यास प्रोत्साहन देणे.

४. सर्वोत्तम कल्पनांचे नामांकन विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग भारत सरकारच्या वेब पोर्टलवर E-MIAS (E-management of INSPIRE Awards Scheme) वर करण्यास मदत करणे.

५. मुख्याध्यापक व शिक्षकांना राष्ट्रीय,राज्य व जिल्हास्तरीय प्रदर्शनी आणि प्रकल्प स्पर्धेचे आयोजन व त्याचे मूल्यांकनाचे स्वरूप समजावून सांगणे.

६. विभागातील जिल्ह्यांमधून सर्वोत्तम साठ प्रतिकृती राष्ट्रीय पुरस्काराकरिता कशा निवडल्या जातील यासाठी कार्यनिती ठरवून मार्गदर्शन करणे.

### ४.नवोपक्रमाचे नियोजन :

### i) उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण :

नवोपक्रम कर्त्याकडे २३ सप्टेंबर २०२१ मध्ये विज्ञान सल्लागार या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला. नवोपक्रम कर्त्याने सुरवातीला योजनेविषयी माहिती जाणून घेऊन विभागातील जिल्ह्यांची सांख्यिकीय माहिती जाणून घेतली. विभागातील पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, मुख्याध्यापक व शिक्षक यांच्याशी सदर योजनेविषयी संवाद साधला. या सर्वातून असे लक्षात आले की, सदर योजनेमध्ये

सहभागी होण्याचं प्रमाण कमी होत आहे. तसेच सदर योजनेविषयी मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये जाणीव जागृतीची गरज आहे. इन्स्पायर अवॉर्ड योजनेमध्ये प्रत्येक शाळेतील सर्वोत्कृष्ट पाच विद्यार्थ्यांच्या कल्पनांची वेब पोर्टलवर ऑनलाईन नामांकन करावयाचे असते.सदर प्रक्रिया खूपच किचकट व तांत्रिक आहे असे बरेचशे मुख्याध्यापक व शिक्षकांचे म्हणणे होते. सर्व शिक्षकांना विद्यार्थ्याने मांडलेल्या कल्पना टॉप सिक्सटी मध्ये पोहोचण्यासाठी विशेष मार्गदर्शनाची गरज जाणवली.

**ii) संबंधित व्यक्तींशी/ तज्ञांशी चर्चा :**

इन्स्पायर अवॉर्ड मानक योजनेविषयी अधिक माहिती असलेल्या विभागातील अधिकारी,मुख्याध्यापक व शिक्षक इ.शी नवोपक्रम कर्त्याने चर्चा केली. विभागातील जे जिल्हे सदर योजनेमध्ये अग्रेसर आहेत अशा जिल्ह्यातील विज्ञान निरीक्षक यांच्याशी चर्चा करून मुख्याध्यापक व शिक्षकांना येणाऱ्या अडचणींविषयी जाणून घेतले. विभागातील यापूर्वी राष्ट्रीय पातळीवरती सादरीकरणास संधी मिळालेल्या व यशस्वी झालेल्या मुख्याध्यापक व शिक्षकांची निवड करून त्यांच्याशी नवोपक्रम कर्त्याने सखोल चर्चा केली.

**iii) आवश्यक साधनांचा विचार :**

जाणीवजागृती निर्मितीसाठी जिल्हानिहाय एक दिवसाची कार्यशाळा आयोजित करण्याचे ठरविले. त्यानुसार पाच जिल्ह्यांमध्ये पूर्वनियोजन करण्यात आले. सदर कार्यशाळा घेण्यासाठी पूर्वतयारी करण्यात आली. कार्यशाळेसाठी लागणारे भौतिक सोयी सुविधा व सादरीकरण संदर्भातील साहित्य उदाहरणार्थ बैठक व्यवस्था, प्रोजेक्टर, पिण्याचे पाणी व लॅपटॉप इ. याअनुषंगाने तयारी करण्यात आली.

**iv) करावयाच्या कृतींचा क्रम :**

सदर एकदिवसीय कार्यशाळेसाठी खालील कृती निश्चित करण्यात आल्या .

१.इन्स्पायर अॅवॉर्ड संदर्भात तज्ञ मुख्याध्यापक व शिक्षक यांची बैठक आयोजित करणे.

२.इन्स्पायर अॅवॉर्ड संदर्भात शिक्षक व विद्यार्थी यांना येणाऱ्या समस्यांची यादी करणे.

३.इन्स्पायर अ‍ॅवॉर्ड संदर्भात शिक्षक व विद्यार्थी यांना येणाऱ्या समस्यांची यादी अंतिम करून एकदिवसीय कार्यशाळेचे प्रारूप निश्चित करणे.

४.राष्ट्रीय पातळीवर इन्स्पायर अ‍ॅवॉर्ड मध्ये निवड झालेल्या कल्पनांची माहिती देणे.

५. इन्स्पायर अ‍ॅवॉर्ड कल्पनांची वेब पोर्टलवर नोंदणी करण्यासंदर्भात माहिती देणे.

६.नोंदणी करण्यासाठी आवश्यक पूर्वतयारी करणे(फोटो, पीडीएफ,बँक तपशील, विद्यार्थी माहिती, प्रोजेक्ट माहिती इ.).

७.वेब पोर्टलवर प्रत्यक्ष नोंदणी करणे.

८. जिल्हास्तरावर राष्ट्रीय पातळीवर निवड झालेल्या कल्पनांवरती चर्चा करणे व सादरीकरण करणे.

९. जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवर कल्पनांच्या मूल्यांकनासंदर्भात माहिती देणे.

१०. विद्यार्थी, शाळा व मुख्याध्यापक यांना होणारे फायदे सांगणे.

११. इन्स्पायर अ‍ॅवॉर्ड संदर्भात शिक्षकांच्या असणाऱ्या शंकांचे समाधान करणे.

१२. सदर कार्यशाळेची अभिप्राय लिंक भरून घेणे.

उपरोक्त घटकानुसार कार्यशाळेमध्ये सादरीकरण करण्यात आले व त्यावरती चर्चा करण्यात आली.

**v) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :**

सदर कार्यशाळेनंतर लगेच प्रत्याभरण लिंक भरून घेण्यात आली. प्रत्येक कार्यशाळेनंतर लिंकमध्ये प्राप्त झालेल्या सूचनेनुसार सुधारणा करून नवीन कार्यशाळेमध्ये माहिती अद्यावत करण्यात आली. जिल्हानिहाय इन्स्पायर अ‍ॅवॉर्डमध्ये रुची असणाऱ्या व विज्ञान अध्यापक मंडळाचे पदाधिकारी यांच्याशी समन्वय साधून संबंधित तालुकानिहाय शिक्षकांच्या समस्या सोडविण्यात आल्या. राज्य व राष्ट्रीय पातळीवर निवड झालेल्या शिक्षक व विद्यार्थ्यांना वेळोवेळी गरजेनुसार मार्गदर्शन करण्यात आले.

**vi) कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक) :**

**टप्पा –१**

पूर्वतयारी करण्यासाठी तज्ञ मार्गदर्शक शिक्षकांच्या बैठकीचे आयोजन करण्याचे निश्चित केले.यामध्ये गरजेनुसार ऑफलाईन व ऑनलाईन बैठका घेण्याचे नियोजन केले.

**टप्पा – २**

बैठकीत सर्वानुमते इन्स्पायर अ‍ॅवॉर्ड जाणीव जागृतीसाठी एकदिवसीय कार्यशाळा घेण्यासाठी जे इनपुट येतील त्यानुसार प्रत्येक सदस्यांनी त्यातील घटक वाटून घेऊन त्यानुषंगाने माहिती तयार करण्याचे नियोजन करण्यात केले.नवोपक्रम कर्त्याने सदर माहिती एकत्रित करून कार्यशाळेसाठी पीपीटी तयार करण्याचे नियोजन केले.गरजेनुसार ऑनलाईन बैठका घेण्याचे निश्चित केले.

**टप्पा – ३**

जिल्हास्तरीय अधिकारी व माध्यमिक विज्ञान शिक्षकांमध्ये इन्स्पायर अवाड्‌र्स मानक कार्यक्रमाबद्दल जागरूकता आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी जिल्हास्तरीय कार्यशाळांचे खालीलप्रमाणे नियोजन करण्यात आले.

**जिल्हानिहाय इन्स्पायर अ‍ॅवार्ड माध्यमिक शिक्षक कार्यशाळा**
**नियोजित तारखा**

| अ.नं. | जिल्हा | कालावधी |
|---|---|---|
| १. | कोल्हापूर | २१ जुलै २०२२ |
| २. | रत्नागिरी | ०२ ऑगस्ट २०२२ |
| ३. | सिंधुदुर्ग | ०३ ऑगस्ट २०२२ |
| ४. | सांगली | ०५ ऑगस्ट २०२२ |
| ५. | सातारा | १० ऑगस्ट २०२२ |

**तक्ता क्र.१**

## इन्स्पायर ॲवार्ड माध्यमिक शिक्षक कार्यशाळा – वेळापत्रक

| अ.नं. | वेळ | विषय |
|---|---|---|
| १. | १०.३० ते ११.०० | नाव नोंदणी |
| २. | ११.०० ते ११.३० | स्वागत व प्रास्ताविक<br>मा.शिक्षण उपसंचालक<br>शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर<br>मा.प्राचार्य<br>जि.शि.व प्र.सं.<br>मा.शिक्षणाधिकारी (माध्य)<br>मा.विज्ञान सल्लागार |
| ३. | ११.३० ते ११.४५ | इन्स्पायर अवार्ड स्वरूप, महत्व व गरज |
| ४. | ११.४५ ते १२.१५ | इन्स्पायर अवार्ड – राष्ट्रीय पातळीवर निवड झालेल्या कल्पना |
| ५. | १२.१५ ते १२.४५ | वेबपोर्टल E-MIAS वर नोंदणी करण्यापूर्वी आवश्यक गोष्टी व पडताळा सूची |
| ६. | १२.४५ ते ०१.१५ | वेबपोर्टल E-MIAS वर निवडलेल्या सर्वोत्तम कल्पनांची नोंदणी |
| ७. | ०१.१५ ते ०१.३० | जिल्हा,राज्य व राष्ट्रीय पातळीवरील मूल्यमापन प्रक्रिया |
| ८. | ०१.३० ते ०१.४५ | विद्यार्थी व शिक्षकांना फायदे |
| ९. | ०१.४५ ते ०२.०० | संबंधित जिल्ह्यातील यशस्वी शिक्षकांचे मनोगत शंका समाधान |
| १० | ०२.०० ते ०२.१० | आभार |

**तक्ता क्र.२**

### viii) उपक्रमासाठी इतरांची मदत :

सदर नवोपक्रमासाठी मा.श्री. महेश चोथे,विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर. मा.डॉ.आय. सी. शेख, प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर यांनी इन्स्पायर अवार्ड मध्ये विभागातील जिल्ह्याची कामगिरी उंचावण्यासाठी प्रेरणा व मार्गदर्शन दिले.

सदर कार्यशाळा घेताना राज्यस्तरावरून नियोजन व प्रत्यक्ष अंमलबजावणी संदर्भात मा.रत्ना गुजर ,संचालक राज्य विज्ञान शिक्षण संस्था,नागपूर , मा.श्री.राजू नेब, विज्ञान पर्यवेक्षक राज्य विज्ञान शिक्षण संस्था,नागपूर यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

संबंधित जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी माध्यमिक , विज्ञान निरीक्षक या सर्वांनी कार्यशाळेचे नियोजन व अंमलबजावणी संदर्भात मोलाचे सहकार्य केले.

सदर कार्यशाळा घेण्याचे निश्चित केल्यानंतर कार्यशाळेचे प्रारूप तयार करण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील इन्स्पायर अवॉर्डमध्ये उत्तम काम करणाऱ्या शिक्षकांनी मोलाची मदत केली (सदर शिक्षकांची यादी परिशिष्ठात जोडली आहे.). तसेच त्यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व कार्यशाळा घेताना विविध विषयांवर शिक्षकांना मार्गदर्शन केले.

सदर कार्यशाळा घेत असताना माझ्या कार्यालयातील सर्व वरिष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता, विषय सहाय्यक, जिल्हा समावेशित शिक्षण समन्वयक, जिल्हा समुपदेशक व कार्यालयीन कर्मचारी यांची नियोजन व अंमलबजावणी संदर्भात मोलाची मदत झाली.

### viii) उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे:

### जिल्हानिहाय घेण्यात आलेल्या कार्यशाळेचा तपशील


| अ.नं. | कार्यशाळा | वार व दिनांक | उपस्थिती | क्षणचित्रे |
|---|---|---|---|---|
| १. | तज्ञ मार्गदर्शक कार्यशाळा | मंगळवार १२/०७/२०२२ | १३ |  |
| २. | शिरोळ/ हातकणंगले | गुरुवार २१/०७/२०२२ | ११३ | |
| ३. | राधानगरी/ भुदरगड | शुक्रवार २२/०७/२०२२ | ८१ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | पन्हाळा/ शाहुवाडी | मंगळवार २६/०७/२०२२ | १०७ |     |
| ५. | मनपा/करवीर/ गगनबावडा | बुधवार २७/०७/२०२२ | १५० | |
| ६. | गडहिंग्लज / आजरा/ चंदगड | गुरुवार २८/०७/२०२२ | १०७ | |
| ७. | कागल | शुक्रवार २९/०७/२०२२ | ५५ | |
| ८. | रत्नागिरी | ०२ ऑगस्ट २०२२ | ३११ | |
| ९. | सातारा | १० ऑगस्ट २०२२ | ३५८ | |
| १०. | सांगली | २९ ऑगस्ट २०२२ | ३८९ | |
| ११. | सिंधुदुर्ग | २९ सप्टेंबर २०२२ | २१९ | |



## तक्ता क्र.३
## ऑनलाईन घेण्यात आलेल्या कार्यशाळेचा तपशील

| अ.नं. | कार्यशाळा | वार व दिनांक | उपस्थिती | क्षणचित्रे |
|---|---|---|---|---|
| १. | तज्ञ मार्गदर्शक बैठक | रविवार १७/०७/२०२२ | १३ |   |
| २. | तज्ञ मार्गदर्शक बैठक | बुधवार २०/०७/२०२२ | १३ | |
| ३. | कोल्हापूर जिल्हा माध्यमिक मुख्याध्यापक व विज्ञान शिक्षक | शुक्रवार २७/०९/२०२२ | सर्व | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | कोल्हापूर, सातारा,सांगली, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग पर्यवेक्षीय यंत्रणेतील सर्व घटक | मंगळवार १०/१०/२०२२ | ४१ | <br>Zoom is the leader in modern enterprise video com...<br>us06web.zoom.us<br>Topic: kolhapur district -Science teacher review meeting<br>Time: Sep 27, 2022 08:00 PM India<br>Join Zoom Meeting<br>https://us06web.zoom.us/j/82141458878?pwd=Q3IvbjFzSGxOL1pRaktjclBjSVphQT09<br>Meeting ID: 821 4145 8878<br>Passcode: 376465<br>कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व माध्यम व व्यवस्थापनाच्या माध्यमिक शाळांतील विज्ञान विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी INSPIRE AWARD नोंदणी बाबत वरील वेळेमध्ये आढावा घेण्यात येणार आहे. तरी सर्व माध्यमिक शाळांतील विज्ञान शिक्षकांनी VC ला वेळेपूर्वी नेटवर्क असणाऱ्या स्थळी उपस्थित राहावे.<br>श्री. एकनाथ आंबोकर,<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक)<br>जिल्हा परिषद, कोल्हापूर.<br>8:31 pm<br>Forwarded |
| ५. | कोल्हापूर जिल्हा माध्यमिक मुख्याध्यापक व विज्ञान शिक्षक | बुधवार १२/१०/२०२२ | सर्व | <br>us06web.zoom.us<br>Topic: kolhapur vc link<br>Time: Oct 12, 2022 08:00 PM India<br>Join Zoom Meeting<br>https://us06web.zoom.us/j/82757802557?pwd=ekRKRFZUU25SUndkcVBrMlBHTEJiQT09<br>Meeting ID: 827 5780 2557<br>Passcode: 219760<br>Inspire award मानक योजनेत एकही विद्यार्थ्यांचे registration/नोंदणी न केलेल्या शाळेचे मुख्याध्यापक व विज्ञान शिक्षक यांनी 10 मिनिट अगोदर सदर झूम मिटींगला उपस्थित राहावे.<br>श्री एकनाथ आंबोकर<br>शिक्षणाधिकारी(माध्यमिक) |

**तक्ता क्र.४**

## प्रसार माध्यमांनी घेतलेली दाखल :



# कार्यशाळेने शिक्षक झाले 'इन्स्पायर'

## शिक्षण विभागाचा पुढाकार; 'विज्ञान'च्या नवनवीन संकल्पनांसाठी साताऱ्यात आयोजन

**मायणी, ता. २५ :** इन्स्पायर अ‍ॅवॉर्ड मानक कार्यशाळेने जिल्ह्यातील विज्ञान शिक्षकांना नवनवीन संकल्पनांची माहिती मिळाली. त्यामुळे रिचार्ज झालेल्या शिक्षकांचा आत्मविश्वास दुणावला असून, आता जिल्ह्यातून अधिकाधिक विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावर चमकतील, अशी आशा शिक्षण विभागाला आहे.

कोल्हापूर विभागाचे उपसंचालक महेश चोथे यांच्या आदेशान्वये साताऱ्याच्या यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेजमध्ये कार्यशाळेचे आयोजन केले. विज्ञान सल्लागार (कोल्हापूर विभाग) रमेश कोरे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रभावती कोळेकर, उपशिक्षणाधिकारी रवींद्र खंदारे, प्राचार्य बी. टी. जाधव, पर्यवेक्षक सुधीर कांबळे, शिक्षण विस्तार अधिकारी मंगल मोरे आदी यावेळी उपस्थित होते. कार्यशाळेचा उद्देश, गरज, महत्त्व आणि इन्स्पायर योजना राबविण्यात शिक्षकांची भूमिका स्पष्ट करून श्री. कोरे म्हणाले, "परिसरातील प्रत्येक गोष्टीचे बारकाईने निरीक्षण हवे. नेहमी येणाऱ्या अडचणी, समस्येतून नावीन्यपूर्ण संकल्पना निवडावी. त्या समस्येवरील उपाय शोधावेत. त्यासाठी लागणारी साधने, प्रत्यक्ष कार्यवाही, साधनाचे उपयोग, वैशिष्ट्य याबाबत विचार करून या संकल्पनेची निवड करावी." प्रत्येक विद्यालयाने सहावी ते दहावी गटातून पाच नावीन्यपूर्ण संकल्पना सादर करण्याबाबत प्रभावती कोळेकर यांनी आवाहन केले. इन्स्पायर अ‍ॅवॉर्डमुळे विद्यार्थ्यांना मिळणारे प्रोत्साहन, देशाच्या विकासामध्ये विद्यार्थ्यांची भूमिका आणि त्यांचा उत्साह टिकवून ठेवण्यासाठी योग्य मार्गदर्शकाची आवश्यकता असल्याचे रवींद्र खंदारे यांनी नमूद केले. प्रा. निकम, मंगल मोरे, योजनेचे जिल्हा समन्वयक लक्ष्मणराव उबाळे यांनीही मार्गदर्शन केले.

दरम्यान, राष्ट्रीय स्तरावर गौरव झालेल्या जिल्ह्यातील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले विद्यालय नायगाव, परखंदी हायस्कूल, सैनिक स्कूल सातारा येथील विज्ञान शिक्षकांनी त्यांचे अनुभव सांगितले. मंगल मोरे यांनी प्रास्ताविक केले. हणमंत जाधव यांनी सूत्रसंचालन केले. प्रशांत भोसले यांनी आभार मानले.

**सातारा : कार्यशाळेत कर्मवीरांच्या प्रतिमेला अभिवादन करताना रमेश कोरे, रवींद्र खंदारे, बी. टी. जाधव, लक्ष्मण उबाळे आदी.**
**(संजय जगताप : सकाळ छायाचित्रसेवा)**



# इन्स्पायर ॲवॉर्ड कार्यशाळेत विज्ञानप्रेमींना मार्गदर्शन

सातारा : पुढारी वृत्तसेवा

येथील यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स कॉलेजमध्ये जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित इन्स्पायर ॲवॉर्ड कार्यशाळा उत्साहात पार पडली. विद्यार्थ्यांच्या जास्तीत जास्त उपकरणांची राष्ट्रीय पातळीवर निवड होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याबाबतचे मार्गदर्शन जिल्ह्यातील सर्व शाळांमधील मुख्याध्यापक व विज्ञानप्रेमी शिक्षकांना करण्यात आले.

यावेळी कोल्हापूर विभागाचे विज्ञान सल्लागार रमेश कोरे, माध्यमिक शिक्षणाधिकारी सौ. प्रभावती कोळेकर, उपशिक्षणाधिकारी रवींद्र खंदारे, प्राचार्या डॉ. बी. टी.जाधव, उपप्राचार्य सुधीर कांबळे, प्रा. एन. टी. निकम, सौ. मंगल मोरे, लक्ष्मण उबाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

रमेश कोरे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या संशोधनवृत्तीस प्रोत्साहन देणे व नवनवीन संकल्पना मांडून त्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे व जास्तीत जास्त उपकरणांची राष्ट्रीय पातळीवर निवडीसाठी प्रयत्न करताना विज्ञान शिक्षकांनाही योग्य मार्गदर्शनासाठी अशा कार्यशाळा आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच इन्स्पायर ॲवॉर्डमध्ये शिक्षकांच्या भूमिकेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. दरम्यान, सौ. शिक्षणाधिकारी प्रभावती कोळेकर यांनी सहावी ते दहावी गटातील प्रत्येक विद्यालयातून पाच नावीन्यपूर्ण संकल्पना सादर करण्याबाबत माहिती दिली.

उपशिक्षणाधिकारी रवींद्र खंदारे यांनी इन्स्पायर ॲवॉर्डमुळे विद्यार्थ्यांना मिळणारे प्रोत्साहन, देशाच्या विकासामध्ये विद्यार्थ्यांची भूमिका व त्यांचा उत्साह टिकून ठेवण्यासाठी मार्गदर्शकाची आवश्यकता याविषयी मार्गदर्शन केले. श्रद्धा व अंधश्रद्धा याचा होणारा परिणाम आणि यामध्ये विज्ञान शिक्षकाची भूमिका, राज्यात इन्स्पायर ॲवॉर्ड योजनेमध्ये जिल्हा अग्रेसर ठेवण्यात शिक्षण विभाग व विज्ञान शिक्षकाची भूमिका, ॲवॉर्डसाठी नाव नोंदणी, संशोधन व उपकरणाची निवड, निरीक्षण नोंदणी याची माहिती देण्यात आली. सूत्रसंचालन हणमंत जाधव यांनी केले. आभार प्रशांत भोसले यांनी मानले.

कार्यशाळेत मार्गदर्शन करताना रमेश कोरे. शेजारी मान्यवर.



इन्स्पायर पारितोषिक कोल्हापूरला आणण्यासाठी शिक्षकांनी नियोजन करावं, डाएटचे प्राचार्य डॉ. ...

विज्ञान विषयातील नावीन्यपूर्ण प्रकल्प आणि संशोधनाला ...

www.youtube.com

https://youtu.be/KZ1z8Y_TRQk

12:31 pm



12:31 pm

Forwarded

इन्स्पायर अ ॅवार्डसाठी कृती कार्यक्रम, तालुकानिहाय विज्ञान शिक्षकांच्या कार्य...

- इन्स्पायर अ ॅवार्डसाठी कृती कार्यक्रम, तालुका...

maharashtranews1.com

https://maharashtranews1.com/Action-Program-for-INSPIRE-Award--Taluka-wise-Science-Teacher-Workshops

12:31 pm

Forwarded

विध्यार्थ्यांनी स्वत:हून "इन्स्पायर ॲवॉर्डसाठी"जास्तीत जास्त सहभागी व्हा...


विध्यार्थ्यांनी स्वत:हून "इन्स्पायर ॲवॉर्डसाठी"जास्..

policecrimediary.in

विध्यार्थ्यांनी स्वत:हून "इन्स्पायर ॲवॉर्डसाठी"जास्तीत जास्त सहभागी व्हावे – रमेश कोरे **कसबा तारळे: पोलिस क्राईम डायरी प्रतिनिधी अशोक पाटील.**

https://policecrimediary.in/?p=2679

12:31 pm



Forwarded

चौफेर न्यूज नेटवर्क

चौफेर न्यूज नेटवर्क. 40 likes. Media/news...

www.facebook.com

**जिल्ह्यातून इन्स्पायर्ड ॲवार्डसाठी विद्यार्थ्यांचे जास्तीत जास्त नामांकन व्हावे- रमेश कोरे**

**दिनांक: 4 ऑगस्ट 2022**

**रत्नागिरी :** जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाकडून रा.भा.शिर्के प्रशाला येथे जिल्ह्यातील विज्ञान शिक्षकांसाठी इन्स्पायर्ड ॲवार्ड कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यशाळेला विज्ञान सल्लागार कोल्हापूर विभाग रमेश कोरे यांचे मार्गदर्शन लाभले.आपल्या मार्गदर्शनात श्री.कोरे यांनी आपल्या शाळांनी इन्स्पायर्डसाठी नामांकन कसे करावे याविषयी माहिती दिली. इन्स्पायर्ड ॲवार्डचे स्वरुप, महत्व व गरज, जिल्हा राज्य व राष्ट्रीय पातळीवरील मूल्यमापन प्रक्रिया, विद्यार्थी व शिक्षकांना इन्स्पायर्ड ॲवार्डचे होणारे फायदे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले व रत्नागिरी जिल्ह्यातून इन्स्पायर्ड ॲवार्डसाठी विद्यार्थ्यांचे जास्तीत जास्त नामांकन व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

या कार्यशाळेसाठी रत्नागिरी जिल्ह्यातील सुमारे 300 विज्ञान शिक्षक उपस्थित होते. श्री.कोरे यांचे

## विभागस्तरावर मिळालेले यश :

## राज्यातील निवडल्या गेलेल्या ०८ विद्यार्थ्यांपैकी ०४ विद्यार्थी विभागातील

विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा या उद्देशाने केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, नवी दिल्ली भारत सरकार यांनी आयोजित केलेल्या ९ व्या Inspire Award MANAK प्रदर्शनामध्ये संपूर्ण देशातून ६.५३ लाख विद्यार्थ्यांनी नाविण्यपूर्ण कल्पना मांडल्या होत्या.त्यापैकी ५५६ विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवर निवडले गेले होते. महाराष्ट्र राज्यातील ३१ विद्यार्थी सहभागी होते, त्यातुन महाराष्ट्रातील ०९ विद्यार्थ्यांची टॉप ६० मध्ये निवड झाली आहे. त्यामध्ये संपूर्ण देशातून सुवर्ण पदक एकाच विद्यार्थ्याला दिले जाते. त्याचा मान महाराष्ट्रातील कोल्हापूर विभागातील यश ज्ञानेश्वर शिंदे या विद्यार्थ्याला मिळाला. सुवर्ण पदकासह टॉप ६० मध्ये विभागातील ०४ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.यात कोल्हापूर मधील ०२, सातारा व सांगली जिल्ह्यातील प्रत्येकी ०१ विद्यार्थ्याचा समावेश आहे.

१३ ते १६ सप्टेंबर दरम्यान पार पडलेल्या या प्रदर्शनाचा समारोप केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री मा. जितेंद्र सिंह यांच्या उपस्थितीत पार पडला.विभागाचे सेक्रेटरी डॉ.श्रीवरी चंद्रशेखर, राष्ट्रीय प्रवर्तन फाउंडेशनचे (NIF) अध्यक्ष डॉ.पी.एस.गोयल , डॉ.बिपिन कुमार , इन्स्पायर अॅवार्ड मानकच्या प्रमुख नमिता गुप्ता आदींच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.यावेळी कोल्हापूर विभागातील खालील विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

| जिल्हा | मिळालेले यश | विद्यार्थ्याचे नाव | उपक्रम | शाळेचे नाव | मार्गदर्शक शिक्षक |
|---|---|---|---|---|---|
| सातारा | सुवर्ण पदक | यश ज्ञानेश्वर शिंदे | मल्टीपरपज केटरींग इक्विपमेंक मशिन | परखंदी हायस्कूल परखंदी, तालुका - वाई | श्री. प्रसाद यादव सर |
| कोल्हापूर | टॉप ६० मध्ये निवड | अनुष्का अनिल कांबळे | शुगरकेन लिफ्टर | हसुर हायस्कूल हसुर दुमाला, तालुका करवीर | श्री. पांडुरंग कांबळे |
| कोल्हापूर | टॉप ६० मध्ये निवड | यश जालिंदर चौगुले | खारीक बी अलगीकरण | डी. सी. नरके विद्यानिकेतन अँड ज्युनि. कॉलेज, कुडित्रे.ता.करवीर | श्री. नितीन काळोलीकर |
| सांगली | टॉप ६० मध्ये निवड | साधना संदीप भिलवडे | सुरक्षित बैलगाडी | समडोळी हायस्कूल समडोळी तालुका - मिरज. | श्री. बापूसो भिलवडे |

**तक्ता क्र.५**




# ‘इन्स्पायर’ पुरस्कारांमध्ये सातारकर यशला सुवर्ण

## कोल्हापूरच्या दोघांसह ९ विद्यार्थ्यांचा सन्मान

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा या उद्देशाने केंद्र सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयांतर्गत इन्स्पायर पुरस्कारासाठी राज्यातील ३१ बालवैज्ञानिकांची आणि त्यांच्या उपकरणाची राष्ट्रीय पातळीवर निवड झालेली होती. त्यामधील नऊ विद्यार्थ्यांचा अंतिम फेरीत सन्मान करण्यात आला असून, साताऱ्याच्या यश शिंदे याने सुवर्णपदक पटकावून महाराष्ट्राच्या शिरपेचात बहुमानाचा तुरा खोवला आहे. राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे दूरध्वनीवरून अभिनंदन केले.

### राज्यातून निवड झालेले हे आहेत नऊ विद्यार्थी

१) यश ज्ञानेश्वर शिंदे-सातारा-सुवर्णपदक विजेता
२) यश जालिंदर चौगुले-कोल्हापूर
३) अनुष्का अनिल कांबळे-कोल्हापूर
४) साधना संदीप भिलावडे-सांगली
५) रिया राजकुमार गायकवाड-पुणे
६) दुर्वेश अनिलराव कोंडेकर-अमरावती
७) ओंकार अनिल शिंदे-बीड
८) संजीवनी अनिल पुरी-जालना
९) आदित्य सुधाकर शिंगणे-नागपूर

सहभाग होता. अंतिम ६० विद्यार्थ्यांमध्ये राज्यातील नऊ विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

# ‘इन्स्पायर’ पुरस्कारांमध्ये सातारकर यशला सुवर्णपदक

## राज्यातील एकूण नऊ विद्यार्थ्यांचा सन्मान, शिक्षणमंत्र्यांकडून कौतुक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा या उद्देशाने केंद्र सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयांतर्गत इन्स्पायर पुरस्कारासाठी राज्यातील ३१ बालवैज्ञानिकांची आणि त्यांच्या उपकरणाची राष्ट्रीय पातळीवर निवड झालेली होती. त्यामधील नऊ विद्यार्थ्यांचा अंतिम फेरीत सन्मान करण्यात आला असून, साताऱ्याच्या यश शिंदे याने सुवर्णपदक पटकावून महाराष्ट्राच्या शिरपेचात बहुमानाचा तुरा खोवला आहे. राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे दूरध्वनीवरून अभिनंदन केले.

यंदा नवव्या इन्स्पायर पुरस्कारासाठी संपूर्ण देशातून ६.५३ लाख विद्यार्थ्यांनी त्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पना आणि प्रयोगाची मांडणी केली होती. त्यापायी ५५६ विद्यार्थ्यांची राष्ट्रीय पातळीवर स्पर्धेसाठी निवड झाली आणि त्यात महाराष्ट्र राज्यातील ३१ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. अंतिम ६० विद्यार्थ्यांमध्ये राज्यातील नऊ विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

### राज्यातून निवड झालेले हे आहेत नऊ विद्यार्थी


१) यश ज्ञानेश्वर शिंदे-सातारा-सुवर्णपदक विजेता
२) यश जालिंदर चौगुले-कोल्हापूर
३) अनुष्का अनिल कांबळे-कोल्हापूर
४) साधना संदीप भिलावडे-सांगली
५) रिया राजकुमार गायकवाड-पुणे
६) दुर्वेश अनिलराव कोंडेकर-अमरावती
७) ओंकार अनिल शिंदे-बीड
८) संजीवनी अनिल पुरी-जालना
९) आदित्य सुधाकर शिंगणे-नागपूर

५) नवोपक्रमाची कार्यपद्धती :

i) पूर्वस्थिती निरीक्षणे व त्याच्या नोंदी :

इन्स्पायर अवॉर्ड संदर्भात मुख्याध्यापक व शिक्षक यांना येणाऱ्या समस्या जाणून घेण्यासाठी नवोपक्रम कर्त्याने त्यांच्याशी संवाद साधला. विभागातील सर्व जिल्ह्यांची इन्स्पायर अवॉर्डमध्ये सहभागा संदर्भात सांख्यिकीय माहिती जाणून घेतली. त्यानुषंगाने कोल्हापूर जिल्ह्यातील तज्ञ मुख्याध्यापक व शिक्षक यांची बैठक घेतली. तसेच त्यांच्या दोन ऑनलाईन बैठका सुद्धा घेण्यात आल्या.

१.इन्स्पायर अवॉर्ड सांख्यिकी माहिती :




| | महाराष्ट्र | कोल्हापूर | रत्नागिरी | सांगली | सातारा | सिंधुदुर्ग | विभागाची एकत्रित संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 2022-23(Appro) | 3507 | 182 | 58 | 146 | 259 | 26 | 671 |
| 2021-22 | 2925 | 142 | 57 | 121 | 220 | 14 | 554 |
| 2020-21 | 3139 | 197 | 77 | 149 | 208 | 29 | 660 |
| 2019-20 | 3844 | 130 | 24 | 371 | 118 | 21 | 664 |
| 2018-19 | 5193 | 207 | 65 | 213 | 161 | 23 | 669 |
| 2017-18 | 1742 | 111 | 47 | 58 | 153 | 18 | 387 |

आलेख क्र.१

ii) कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन :

सदर नवोपक्रम घेत असताना सुरुवातीला कोल्हापूर, रत्नागिरी, सातारा, सांगली व सिंधुदुर्ग या क्रमाने कार्यशाळा घेण्यात आल्या. कार्यशाळा घेतल्यानंतर प्रत्येक कार्यशाळेमध्ये तयार करण्यात आलेल्या प्रारूपामध्ये कोणता बदल करणे

अपेक्षित आहे. याविषयी शिक्षकांशी चर्चा करण्यात आली. तसेच शिक्षकांकडून प्रत्याभरण लिंक भरून घेण्यात आली. लिंकमध्ये प्राप्त मार्गदर्शक सूचनानुसार पुढील कार्यशाळेमध्ये पीपीटी व माहितीच्या सादरीकरणांमध्ये सुधारणा करण्यात आल्या.

**iii) उपक्रम पूर्ण झाल्यावर केलीली निरीक्षणे व त्यांच्या नोंदी :**

करून विज्ञानाचा जागर शिक्षक झाले इन्स्पायर हा उपक्रम पूर्ण झाल्यानंतर विभागातील सर्व मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यामध्ये इन्स्पायर अवॉर्ड या योजनेविषयी जाणीव जागृती निर्माण झाली होती. प्रत्येक जिल्ह्यामधून शिक्षकांचे फोन येत होते. सप्टेंबर महिन्यामध्ये विज्ञान प्रदर्शन, अखिल भारतीय विज्ञान मेळावा, विज्ञान नाट्योत्सव स्पर्धा अशा उपक्रमांची गर्दी असून सुद्धा शिक्षकांनी या योजनेमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवल्याचे आकडेवारीवरून सिद्ध होते. तसेच यापूर्वी वेबसाईट वरती अपलोड करणाऱ्या नवप्रकल्पांमध्ये गुणात्मक बदल झाल्याचे शिक्षकांच्या बोलण्यातून जाणवले.

**iv) कार्यवाही करताना आलेल्या अडचणी:**

सदर नवोपक्रम घेत असताना नवोपक्रम कर्त्यास खालील अडचणी जाणवल्या.

१.शिक्षकांच्या जिल्हास्तरीय कार्यशाळा घेण्यात आल्या होत्या, त्यामुळे जिल्ह्यातील सर्व शिक्षक एकाच व्यासपीठावरती एकत्र येतील अशा भौतिक सोयीसुविधेची अडचण जाणवली.

२. सदर कार्यशाळेसाठी कोणताही आर्थिक निधी उपलब्ध नसल्यामुळे मर्यादा आल्या.उदाहरणार्थ - प्रवास,चहा, नाष्टा व भोजन इ.

३.सदर नवोपक्रम घेत असताना कार्यशाळेसाठी वेळेच्या मर्यादा जाणवल्या.


४.सदर उपक्रम आयोजित करताना इंटरनेट कनेक्टिव्हिटी अभावी वेबसाईट वरील काही बाबी दाखवण्यास मर्यादा आल्या.

v) माहितीचे विश्लेषण आलेख, तक्ते:

१ इन्स्पायर अवॉर्ड मानक संदर्भात मिळालेल्या माहितीबाबत आपण समाधानी आहात का?

| इन्स्पायर अँवार्ड कार्यशाळा फिडबॅक लिंक प्रतिसाद (एकूण प्रतिसादक – ७५६) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | प्रश्न | होय प्रतिसादक | नाही प्रतिसाद |
| १ | इन्स्पायर अवॉर्ड मानक संदर्भात मिळालेल्या माहितीबाबत आपण समाधानी आहात का? | ७५६ | ० |

तक्ता क्र.६





आलेख क्र.२

२. इन्स्पायर अवॉर्ड साठी आवश्यक कल्पनांचे स्वरूप स्पष्ट झाले का?

| इन्स्पायर अँवार्ड कार्यशाळा फिडबॅक लिंक प्रतिसाद (एकूण प्रतिसादक – ७५६) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | प्रश्न | होय प्रतिसादक | नाही प्रतिसाद |
| २ | इन्स्पायर अवॉर्ड साठी आवश्यक कल्पनांचे स्वरूप स्पष्ट झाले का? | ७५६ | ० |

तक्ता क्र.७





आलेख क्र.३

३. वेब पोर्टल E-MIAS वर नोंदणी करण्यासाठी आवश्यक बाबी कार्यशाळेतून स्पष्ट झाल्या का?

| इन्स्पायर अँवार्ड कार्यशाळा फिडबॅक लिंक प्रतिसाद (एकूण प्रतिसादक – ७५६) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | प्रश्न | होय प्रतिसादक | नाही प्रतिसाद |
| ३ | वेब पोर्टल E-MIAS वर नोंदणी करण्यासाठी आवश्यक बाबी कार्यशाळेतून स्पष्ट झाल्या का? | ७५२ | ४ |

तक्ता क्र.८





आलेख क्र.४

४. इन्स्पायर अवॉर्ड संदर्भातील विविध स्तरावरील मूल्यमापन प्रक्रिया ज्ञात झाली का?

| इन्स्पायर अँवार्ड कार्यशाळा फिडबॅक लिंक प्रतिसाद (एकूण प्रतिसादक – ७५६) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | प्रश्न | होय प्रतिसादक | नाही प्रतिसाद |
| ४ | इन्स्पायर अवॉर्ड संदर्भातील विविध स्तरावरील मूल्यमापन प्रक्रिया ज्ञात झाली का? | ७५१ | ५ |

तक्ता क्र.९





आलेख क्र.५

५. इन्स्पायर अवॉर्ड मुळे विद्यार्थ्यां, शिक्षक व शाळा यांना होणारे फायदे स्पष्ट करू शकाल का?

| इन्स्पायर अँवार्ड कार्यशाळा फिडबॅक लिंक प्रतिसाद (एकूण प्रतिसादक – ७५६) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | प्रश्न | होय प्रतिसादक | नाही प्रतिसाद |
| ५ | इन्स्पायर अवॉर्ड मुळे विद्यार्थ्यां, शिक्षक व शाळा यांना होणारे फायदे स्पष्ट करू शकाल का? | ७५६ | ० |

तक्ता क्र.१०





आलेख क्र.६

## ६. साधन व्यक्तींकडून मिळालेली माहिती आपणास कशी वाटली?

| साधन व्यक्तींकडून मिळालेली माहिती आपणास कशी वाटली? (एकूण प्रतिसादक – ७५६) | | |
|---|---|---|
| अ.क्र. | निकष | प्रतिसाद |
| १ | सर्वोत्कृष्ट | १०७ |
| २ | उत्कृष्ट | २४९ |
| ३ | उत्तम | २१७ |
| ४ | चांगली | १६६ |
| ५ | बरी | १७ |

**तक्ता क्र.११**




**आलेख क्र.७**

## ६.नवोपक्रमाची यशस्विता/फलनिष्पत्ती :

१.जिल्हास्तरीय अधिकारी,मुख्याध्यापक,शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये इन्स्पायर ॲवॉड्‌र्स मानक कार्यक्रमाबद्दल अडचणी जाणून घेऊन एकदिवसीय कार्यशाळेचे प्रारूप तयार करणे.

**जिल्हास्तरीय अधिकारी,मुख्याध्यापक,शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये इन्स्पायर ॲवॉड्र्स मानक कार्यक्रमासाठी तयार केलेले एक दिवसीय कार्यशाळेचे प्रारूप सर्व शिक्षकांना आवडल्याचे प्राप्त माहितीवरून दिसून आले. (संदर्भ - तक्ता क्र ६ ते ११)**

२.जिल्हास्तरीय अधिकारी,मुख्याध्यापक,शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये इन्स्पायर ॲवॉड्र्स मानक कार्यक्रमाबद्दल जागरूकता आणि कार्यक्षमता वाढविण्याकरिता क्षेत्रीय कार्यशाळेंचे आयोजन करणे.

**जिल्हास्तरीय अधिकारी मुख्याध्यापक व शिक्षक यांच्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळेला पाचही जिल्ह्यातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले. सदर कार्यशाळेमध्ये एकूण १९४४ माध्यमिक शिक्षक सहभागी झाले होते.(संदर्भ - तक्ता क्र.३ व ४)**

३. मुख्याध्यापकाद्वारे शाळेमध्ये आयडिया स्पर्धेचे आयोजन करून सर्वोत्तम कल्पना निवडण्यास प्रोत्साहन देणे.

**मुख्याध्यापकांद्वारे शाळेमध्ये आयडिया स्पर्धेचे आयोजन कोणत्या पद्धतीने करावे याविषयी कार्यशाळेत सादरीकरण करण्यात आले. यात ७५६ शिक्षकांनी फीडबॅक लिंक भरली होती. सर्वच शिक्षकांना सदर आयडिया स्पर्धेचे आयोजन व त्यातून चांगल्या कल्पना कशा निवडाव्यात याची प्रक्रिया माहिती झाल्याचे दिसून आले. (संदर्भ - तक्ता क्र.७)**

४. सर्वोत्तम कल्पनांचे नामांकन विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग भारत सरकारच्या वेब पोर्टलवर E-MIAS (E-management of INSPIRE Awards Scheme) वर करण्यास मदत करणे.

**निवडण्यात आलेल्या सर्वोत्तम कल्पनांचे नामांकन विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या वेब पोर्टलवर करण्यासंदर्भात येणाऱ्या तांत्रिक अडचणींविषयी ७५६ पैकी ७५२ शिक्षकांनी सदर प्रक्रिया पूर्णपणे समजल्याचे सांगितले . (संदर्भ - तक्ता क्र.८)**

५. मुख्याध्यापक व शिक्षकांना राष्ट्रीय,राज्य व जिल्हास्तरीय प्रदर्शनी आणि प्रकल्प स्पर्धेचे आयोजन व त्याचे मूल्यांकनाचे स्वरूप समजावून सांगणे.

इन्स्पायर अवॉर्ड संदर्भात राष्ट्रीय, राज्य व जिल्हास्तरीय प्रदर्शनी मध्ये सादरीकरण संदर्भात मूल्यमापनाचे निकष याविषयी सदर कार्यशाळेतून मूल्यमापन प्रक्रिया ७५६ पैकी ७५१ शिक्षकांनी समजण्याचे नमूद केले व याचा फायदा यावर्षी राष्ट्रीय पातळीवरती झालेल्या प्रदर्शनीमध्ये शिक्षकांना झाल्याचे जाणवले. (संदर्भ - तक्ता क्र.९)

६. विभागातील जिल्ह्यांमधून सर्वोत्तम साठ प्रतिकृती राष्ट्रीय पुरस्काराकरिता कशा निवडल्या जातील यासाठी कार्यनिती ठरवून मार्गदर्शन करणे.

विभागातील जिल्ह्यांमधून इन्स्पायर अवॉर्ड कार्यशाळा घेण्यामागचे ध्येयच निश्चित करण्यात आले होते की महाराष्ट्राला राष्ट्रीय पातळीवर पहिल्या तीन पदकांमध्ये स्थान मिळावे. यावर्षी झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये विभागाला उल्लेखनीय यश मिळाले. केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, नवी दिल्ली भारत सरकार यांनी आयोजित केलेल्या ९ व्या Inspire Award MANAK प्रदर्शनामध्ये संपूर्ण देशातून ६.५३ लाख विद्यार्थ्यांनी नाविण्यपूर्ण कल्पना मांडल्या होत्या.त्यापैकी ५५६ विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवर निवडले गेले होते. महाराष्ट्र राज्यातील ३१ विद्यार्थी सहभागी होते, त्यातुन महाराष्ट्रातील ०९ विद्यार्थ्यांची टॉप ६० मध्ये निवड झाली आहे. त्यामध्ये संपूर्ण देशातून सुवर्ण पदक एकाच विद्यार्थ्याला दिले जाते. त्याचा मान महाराष्ट्रातील कोल्हापूर विभागातील यश ज्ञानेश्वर शिंदे या विद्यार्थ्याला मिळाला. सुवर्ण पदकासह टॉप ६० मध्ये विभागातील ०४ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.यात कोल्हापूर मधील ०२, सातारा व सांगली जिल्ह्यातील प्रत्येकी ०१ विद्यार्थ्याचा समावेश आहे.यातून यापूर्वी घेण्यात आलेल्या कार्यशाळेचा नक्कीच लाभ झाल्याचे सिद्ध होते.तसेच नवोपक्रम कर्त्यास राष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाली (संदर्भ - तक्ता क्र.५ व वर्तमान पत्रातील कात्रणे)

७. समारोप :

विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळावा या उद्देशाने केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, नवी दिल्ली भारत सरकार दरवर्षी Inspire Award MANAK प्रदर्शन आयोजित करते. इन्स्पायर ॲवॉर्ड्स मानक ही योजना शालेय मुलांमध्ये सृजनशील आणि रचनात्मक विचारांची संस्कृती विकसित करण्यासोबतच विज्ञान आणि

तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सामाजिक गरजांना पूर्ण करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. नवोपक्रम कर्त्याने विभागातील अधिकारी व विज्ञान शिक्षकांसाठी इंस्पायर ॲवार्ड मानक कार्यक्रमाबद्दल जागरूकता आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी जिल्हास्तरीय कार्यशाळा मा.महेश चोथे,शिक्षण उपसंचालक,कोल्हापूर व डॉ.आय.सी.शेख प्राचार्य, DIET कोल्हापूर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केल्या होत्या. त्यामध्ये इन्स्पायर अवॉर्डमध्ये नामांकने वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करणे,विद्यार्थ्यांना प्रेरित करून त्यांना राष्ट्रीय पातळीवर यश मिळविण्यासाठी कल्पनांची मांडणी करणे, रजिस्ट्रेशन पूर्वतयारी व रजिस्ट्रेशन करणे, तांत्रिक अडचणी, यापूर्वी राष्ट्रीय पातळीवर गेलेले प्रोजेक्ट ,जिल्हा ,राज्य व राष्ट्रीय पातळीवर परीक्षणाची पद्धत, कल्पना मांडताना विचारांची दिशा इ. बाबत संवाद साधण्यात आला. सर्व जिल्ह्यात घेतलेल्या कार्यशाळा व त्याला पर्यवेक्षीय यंत्रणेतील सर्व घटक ,सर्व मुख्याध्यापक,शिक्षक व विद्यार्थी यांनी दिलेला सकारात्मक प्रतिसाद यामुळे जाणीवजागृती होण्यास मदत झाली.यातून विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती वाढीस लागण्याचा मार्ग प्रशस्त होईल असा नवोपक्रम कर्त्यास विश्वास आहे.

## ८.संदर्भसूची व परिशिष्टे :

## संदर्भसूची :

### मराठी संदर्भ ग्रंथ

भिंताडे , वि . रा . ( २००८ ) शैक्षणिक संशोधन पद्धती , पुणे : नित्यनूतन प्रकाशन
मुळे , रा.शं. आणि उमाटे , वि . तु . ( १ ९ ८७ ) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे , नागपूर : महाराष्ट्र विद्यापीट गंथ निर्मिती मंडळ .
राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०.
राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५
माशेलकर रघुनाथ (२००४) शोध नव्या भारताचा, पुणे: सह्याद्री प्रकाशन
माझा वेगळा उपक्रम (२०१२) ,पुणे:महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

### Webliography

https://www.education.gov.in/en.

https://mr.vikaspedia.in/education/
https://www.inspireawards-dst.gov.in/
https://www.maa.ac.in/index.php?tcf=innovation२०२१_२२
https://nif.org.in/
https://ncert.nic.in

परिशिष्टे :

# १.तज्ञ मार्गदर्शक यादी

| अ.नं. | नाव | शाळेचे नाव | मोबाईल नंबर | |
|---|---|---|---|---|
| १. | श्री.सागर कुमार चुडाप्पा | खोतवाडी हायस्कूल ,खोतवाडी ता.शिरोळ | ९८९०९४७४७५ | गट अ |
| २. | श्री.श्रीशैल मठपती | दे.रत्नाप्पा कुंभार हायस्कूल,राजापूर ता.शिरोळ | ९९२२२४२४७० | |
| ३. | श्री.आण्णाप्पा परीट | न्यू इंग्लिश स्कूल & ज्युनिअर कॉलेज,लाट ता.शिरोळ | ९९६००१८०१९ | |
| ४. | श्री.ओंकार बळवंत कुलकर्णी | दानोळी हायस्कूल, दानोळी ता.शिरोळ | ८६०५९२८५३७ | |
| ५. | श्री.सत्याप्पा सिद्धप्पा हजारे | भा.रा.यादव हायस्कूल,सावर्डे तर्फ सातवे ता.पन्हाळा | ९९२३९१९६९४ | |
| ६. | श्रीम.स्वप्नाली पाटील | पद्माराजे विद्यालय,शिरोळ | ७७०९३६६१०० | |
| ७. | श्रीम.जयश्री बडबडे | जनतारा कल्पवृक्ष विद्यालय,जयसिंगपूर ता.शिरोळ | ९५७९४८८१०८ | |
| ८. | श्री.आनंदराव चरापले | बाळासाहेब पाटील कौलवकर हायस्कूल.कौलव ता.राधानगरी | ९९७०७९१६४५ | गट ब |
| ९. | श्री.आक्रम तांबोळी | न्यू इंग्लिश स्कूल & ज्युनिअर कॉलेज,लाट ता.शिरोळ | ९५२९२६४६६५ | |
| १०. | श्री.सुधीर अप्पय्या आमनगी | माध्यमिक विद्यालय, कसबा आरळे ता.करवीर | ९४२१११३७३२ | |
| ११. | श्रीम.वर्षा सुर्यकांत मस्के | उषाराजे हायस्कूल,कोल्हापूर ता.करवीर | ७९७२८४५५९५ | |
| १२. | श्रीम.गिरीजा घोरपडे | सेंट झेवियर हायस्कूल,कोल्हापूर ता.करवीर | ८८३०६६३२२३ | |
| १३. | श्री.संजय गावडे | देशभूषण हायस्कूल,कोल्हापूर | ९४२२०४३६०५ | |

२.इन्स्पायर ॲवॉर्ड कार्यशाळेसाठीचे नियोजन

## जिल्हानिहाय इन्स्पायर ॲवार्ड माध्यमिक शिक्षक कार्यशाळा

नियोजित तारखा

| अ.नं. | जिल्हा | कालावधी |
|---|---|---|
| १. | कोल्हापूर | २१ जुलै २०२२ |
| २. | रत्नागिरी | ०२ ऑगस्ट २०२२ |
| ३. | सिंधुदुर्ग | ०३ ऑगस्ट २०२२ |
| ४. | सांगली | ०५ ऑगस्ट २०२२ |
| ५. | सातारा | १० ऑगस्ट २०२२ |

## इन्स्पायर ॲवार्ड माध्यमिक शिक्षक कार्यशाळा – वेळापत्रक

| अ.नं. | वेळ | विषय |
|---|---|---|
| १. | १०.३० ते ११.०० | नाव नोंदणी |
| २. | ११.०० ते ११.३० | स्वागत व प्रास्ताविक<br>मा.शिक्षण उपसंचालक<br>शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर<br>मा.प्राचार्य<br>जि.शि.व प्र.सं.<br>मा.शिक्षणाधिकारी (माध्य)<br>मा.विज्ञान सल्लागार |
| ३. | ११.३० ते ११.४५ | इन्स्पायर अवार्ड स्वरूप, महत्व व गरज |
| ४. | ११.४५ ते १२.१५ | इन्स्पायर अवार्ड - राष्ट्रीय पातळीवर निवड झालेल्या कल्पना |
| ५. | १२.१५ ते १२.४५ | वेबपोर्टल E-MIAS वर नोंदणी करण्यापूर्वी आवश्यक गोष्टी व पडताळा सूची |
| ६. | १२.४५ ते ०१.१५ | वेबपोर्टल E-MIAS वर निवडलेल्या सर्वोत्तम कल्पनांची नोंदणी |
| ७. | ०१.१५ ते ०१.३० | जिल्हा,राज्य व राष्ट्रीय पातळीवरील मूल्यमापन प्रक्रिया |
| ८. | ०१.३० ते ०१.४५ | विद्यार्थी व शिक्षकांना फायदे |
| ९. | ०१.४५ ते ०२.०० | शंका समाधान |
| १० | ०२.०० ते ०२.१० | आभार |

## २.इन्स्पायर ॲवॉर्ड कार्यशाळेसाठी देण्यात आलेली फिडबॅक लिंक

https://forms.gle/s४pBGcvJHgRkN७u२A

## अभिप्राय FEEDBACK

**माध्यमिक शिक्षक इन्स्पायर अवॉर्ड मानक कार्यशाळा अभिप्राय**
**१. सर्व माहिती मराठीतून भरावी.**
**२. अंक इंग्रजीत भरावेत.**

korerameshश२@gmail.com Switch account

* Required

Email*

Your email

शाळेचे नाव*

Your answer

शिक्षकाचे नाव*

Your answer

शाळेचा पत्ता*

Your answer

मोबाईल नंबर*

शाळेचा प्रकार*

शासकीय
खाजगी अनुदानित
खाजगी विनाअनुदानित

स्वयं अर्थसहायित
समाज कल्याण

शाळेचे माध्यम*

मराठी
इंग्रजी
उर्दू

तालुका *

Your answer

जिल्हा*

Your answer

इन्स्पायर अवार्ड साठी राष्ट्रीय स्तरावर मिळवलेले यश*

Your answer

इन्स्पायर अवॉर्ड मानक संदर्भात मिळालेल्या माहितीबाबत आपण समाधानी आहात का?*

होय
नाही

वेब पोर्टल E-MIAS वर नोंदणी करण्यासाठी आवश्यक बाबी कार्यशाळेतून स्पष्ट झाल्या का?*

होय
नाही

इन्स्पायर अवॉर्ड साठी आवश्यक कल्पनांचे स्वरूप स्पष्ट झाले का?*

होय
नाही

इन्स्पायर अवॉर्ड संदर्भातील विविध स्तरावरील मूल्यमापन प्रक्रिया ज्ञात झाली का?*

होय
नाही

इन्स्पायर अवॉर्ड मुळे विद्यार्थ्यां, शिक्षक व शाळा यांना होणारे फायदे स्पष्ट करू शकाल का?*

होय
नाही

साधन व्यक्तींकडून मिळालेली माहिती आपणास कशी वाटली?*

बरी
चांगली
उत्तम
उत्कृष्ट
सर्वोत्कृष्ट

भविष्यात इन्स्पायर अवॉर्ड मानक कार्यशाळेतून कोणती माहिती मिळावी असे आपल्याला वाटते?*

Your answer

सदर कार्यशाळेबाबत कोणत्या सुधारणा सुचवाल?*

३.कार्यशाळेसाठी तयार करण्यात आलेल्या पीपीटीची लिंक

https://drive.google.com/drive/folders/१qqG६yiq१XWEGZdt०cwo६OZDd DZ२z८hEr?usp=share_link Rough.docx

४.तज्ञांना दिलेली प्रमाणपत्रे :



महाराष्ट्र शासन

शिक्षण उपसंचालक कार्यालय,कोल्हापूर

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (DIET), कोल्हापूर

शिक्षण विभाग जिल्हा परिषद, कोल्हापूर

इन्स्पायर ॲवार्ड कार्यशाळा - २०२२

प्रमाणपत्र

अनुक्रमांक : 12

दिनांक : 29/07/2022

श्री.संजय गावडे - सहा.शिक्षक (देशभूषण हायस्कूल,कोल्हापूर) यांनी दि. 21/07/2022 ते 29/07/2022 या कालावधीसाठी आयोजित कोल्हापूर जिल्ह्यातील इन्स्पायर अवार्ड - २०२२ कार्यशाळेसाठी जिल्हा साधन व्यक्ती म्हणून उत्कृष्ट योगदान दिले याबद्दल त्यांना हे प्रमाणपत्र सन्मानपूर्वक देणेत येत आहे.

(श्री.रमेश कोरे)
विज्ञान सल्लागार
शिक्षण उपसंचालक कार्यालय,कोल्हापूर
तथा
अधिव्याख्याता, DIET, कोल्हापूर

(श्री.एकनाथ आंबोकर)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, कोल्हापूर

(श्री.महेश चोथे)
शिक्षण उपसंचालक
विभागीय कार्यालय,कोल्हापूर

(डॉ. आय.सी.शेख)
प्राचार्य
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण
कोल्हापूर

# ५.इन्स्पायर ॲवॉर्ड मानक माहिती



# इन्स्पायर अवार्ड योजनेत राष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्र टीमचे प्रतिनिधीत्व

प्रादेशिक विद्या प्राधिकरण

(राज्य विज्ञान व गणित शिक्षण संस्था)

रविनगर, नागपूर ४४०००१

## ......कार्यमुक्त प्रमाणपत्र......

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती ------- रमेश बापू कोरे -------

पदनाम विज्ञान सल्लागार ---- शाळेचे /कार्यालयाचे नाव शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर जिल्हा------ कोल्हापूर ------------ हे / हा Inspire Award ( NLEPC) राष्ट्रीयस्तर स्पर्धा 2020-21 या कार्यक्रमामध्ये प्रगती मैदान नवी दिल्ली येथे दिनांक 13 **सप्टेंबर 2022 ते 16 सप्टेंबर 2022 या कालावधीत** उपस्थित होते/होत्या.

त्यांना आज दिनांक 16 **सप्टेंबर 2022** रोजी कार्यक्रम संपल्यानंतर कार्यमुक्त करण्यात येत आहे. त्यांचा प्रवास व दैनिक भत्ता या कार्यालयामार्फत अदा करण्यात आलेला नाही.

**दिनांक:-** 16 **सप्टेंबर** 2022

**स्थळ:- प्रगती मैदान नवी दिल्ली**

(डॉ.रत्ना गुजर)

**संचालक**

प्रादेशिक विद्या प्राधिकरण,नागपूर

(राज्य विज्ञान शिक्षण संस्था)